# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### वाणिज्य विभाग

# जीवन समृद्ध करणाऱ्या शिक्षणाची गरज : गोडसे

## राजगुरू महाविद्यालयात चर्चासत्राचे आयोजन

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

आपल्याकडे प्रचंड प्रमाणात नवयुवक 'करिअर'साठी उपलब्ध होत असून त्यांचे समाधान करणारी साधनसंपत्ती उपलब्ध नाही. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर आपले जीवन समृद्ध करणाऱ्या, आपल्या जाणिवा विकसित करणाऱ्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील एक्सेल गॅस अॅन्ड इक्युपमेंट प्रा. लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नितीन गोडसे यांनी केले.

गुणवत्ता सुधार उपक्रमाअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने ८ व ९ फेब्रुवारीला उद्योजकता व नेतृत्व विकासात उच्चशिक्षणाची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी गोडसे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, अॅड. माणिक पाटोळे, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे, भैरू चौगुले या वेळी उपस्थित होते. मनोज सुपेकर, पुणे विद्यापीठातील डॉ. एम. जी. मुल्ला, डॉ. एम. आर. अवघडे, औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. सईद अजरुद्दिन, डॉ. नंदकुमार राठी यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. टी. जी. गिते, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या चर्चासत्रात सहभागी ६० संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, समन्वयक प्रा. गणेश धुमाळ, सहसमन्वयक प्रा. ए. एस. पवार, समिती सदस्य म्हणून प्रा. पी. पी. ओसवाल, प्रा. एस. ए. वीर, प्रा. टी. बी. वेहळे, प्रा. आर. एन. कातोरे, प्रा. एच. एस. चौधरी, प्रा. सुर्वे, प्रा. अभिजित बेंडाले, प्रा. सचिन गायकवाड, प्रा. मीनल बोगाडे, प्रा. रवींद्र मोरे यांनी संयोजन केले.

प्रास्ताविक डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. काजल शहा, प्रा. रसिका तांबे, यांनी तर आभार प्रा. गणेश धुमाळ यांनी मानले.



चर्चासत्रात सहभागी मान्यवरांच्या हस्ते शोधनिबंधाचे प्रकाशन करण्यात आले.



राजगुरूनगर : राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी झालेल्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# जीवन समृद्ध करणाऱ्या शिक्षणाची सध्या गरज

## नितीन गोडसे : राजगुरूनगरात चर्चासत्र

राजगुरूनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - आपले जीवन समृद्ध करणाऱ्या, आपल्या जाणिवा विकसित करणाऱ्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील एक्सेल गॅस अँड इक्युपमेंट प्रा.लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नितीन गोडसे यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्यावतीने 'उद्योजकता व नेतृत्व विकासात उच्चशिक्षणाची भूमिका' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी गोडसे बोलत होते. याप्रसंगी अँड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, अँड. माणिक पाटोळ आणि विविध महाविद्यालयातून आलेले प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

नितीन गोडसे म्हणाले की, आज पारंपरिक शिक्षणातून जीवन व्यतीत करण्याचा मार्ग सुलभ राहिला नाही. या रूळलेल्या मार्गावर जाऊन जीवनात यशस्वी होता येणार नाही. हे प्रचंड स्पर्धेचे युग असून जे सक्षम आहेत तेच टिकणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्याभिमुख शिक्षणाचा विचार करायला हवा. त्यासाठी सर्वोत्तम शिक्षण घ्या. स्वत:वर विश्वास ठेवा. स्वत:चा आदर करा, पूर्ण क्षमतेने काम करा, कामातून समाधान शोधा आणि यातून चांगली कार्यसंस्कृती निर्माण करा, असे आवाहन त्यांनी केले.

**राज्यस्तरीय चर्चासत्रात सुमारे ६० संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश**

या चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी.जाधव, मुंबई विद्यापीठातील प्रा. मनोज सुपेकर, पुणे विद्यापीठातील डॉ. एम. जी. मुल्ला, डॉ. एम. आर. अवघडे, औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. सईद अजरुद्दिन, डॉ. नंदकुमार राठी यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ.टी. जी. गिते, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

चर्चासत्रात सहभागी झालेल्या सुमारे ६० संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काजल शहा, प्रा. रसिका तांबे तर प्रा.गणेश घुमाळ यांनी आभार मानले.

# राजगुरु विद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्राला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** जीवन समृद्ध करणाऱ्या, आपल्या जाणिवा विकसित करणाऱ्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन नितीन गोडसे यांनी केले. गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित ' उद्योजकता व नेतृत्व विकासात उच्चशिक्षणाची भूमिका' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील अध्यक्षस्थानी होते.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे, भैरू चौगले आणि विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, की माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. ओला, उबरसारख्या कंपन्या केवळ तंत्रज्ञानाच्या साह्याने सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेत नाव मिळवून आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात व व्यवसायातही व्हायला हवा. सध्या समाजात लोकांच्या हाताला काम देणारा उद्योजक निर्माण होण्याची गरज आहे. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आले असून विद्यापीठीय अभ्यासक्रम हा कौशल्याभिमुख असायला हवा.

या चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी. जाधव, मुंबई विद्यापीठातील प्रा. मनोज सुपेकर, पुणे विद्यापीठातील डॉ. एम. जी. मुल्ला, डॉ. एम. आर. अवघडे, औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. सईद अजरुद्दिन, डॉ. नंदकुमार राठी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. गणेश धुमाळ यांनी आभार मानले.

लोकमत

# राजगुरु विद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्राला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** जीवन समृद्ध करणाऱ्या, आपल्या जाणिवा विकसित करणाऱ्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन नितीन गोडसे यांनी केले. गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित ' उद्योजकता व नेतृत्व विकासात उच्चशिक्षणाची भूमिका' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील अध्यक्षस्थानी होते.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, ॲड. माणिक पाटोळे, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे, भैरु चौगले आणि विविध महाविद्यालयांतून आलेले प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, की माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. ओला, उबरसारख्या कंपन्या केवळ तंत्रज्ञानाच्या साह्याने सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेत नाव मिळवून आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात व व्यवसायातही व्हायला हवा. सध्या समाजात लोकांच्या हाताला काम देणारा उद्योजक निर्माण होण्याची गरज आहे. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आले असून विद्यापीठीय अभ्यासक्रम हा कौशल्याभिमुख असायला हवा.

या चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी. जाधव, मुंबई विद्यापीठातील प्रा. मनोज सुपेकर, पुणे विद्यापीठातील डॉ. एम. जी. मुल्ला, डॉ. एम. आर. अवघडे, औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. सईद अजरुद्दिन, डॉ. नंदकुमार राठी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. गणेश धुमाळ यांनी आभार मानले.

२४ जानेवारी २०१९ MY पुणे जिल्हा उत्तर पुढारी




राजगुरुनगर : राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी झालेल्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# जीवन समृद्ध करणाऱ्या शिक्षणाची सध्या गरज

## नितीन गोडसे : राजगुरुनगरात चर्चासत्र

**राज्यस्तरीय चर्चासत्रात सुमारे ६० संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश**

राजगुरूनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - आपले जीवन समृद्ध करणाऱ्या, आपल्या जाणिवा विकसित करणाऱ्या शिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील एक्सेल गॅस अँड इक्युपमेंट प्रा.लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नितीन गोडसे यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्यावतीने 'उद्योजकता व नेतृत्व विकासात उच्चशिक्षणाची भूमिका' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी गोडसे बोलत होते. यावेळी अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. माणिक पाटोळे आणि विविध महाविद्यालयातून आलेले प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

नितीन गोडसे म्हणाले की, आज पारंपरिक शिक्षणातून जीवन व्यतीत करण्याचा मार्ग सुलभ राहिला नाही. या रुळलेल्या मार्गावर जाऊन जीवनात यशस्वी होता येणार नाही. हे प्रचंड स्पर्धेचे युग असून जे सक्षम आहेत तेच टिकणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्याभिमुख शिक्षणाचा विचार करायला हवा. त्यासाठी सर्वोत्तम शिक्षण घ्या, स्वतःवर विश्वास ठेवा. स्वतःचा आदर करा, पूर्ण क्षमतेने काम करा, कामातून समाधान शोधा आणि यातून चांगली कार्यसंस्कृती निर्माण करा, असे आवाहन त्यांनी केले.

या चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी.जाधव, मुंबई विद्यापीठातील प्रा. मनोज सुपेकर, पुणे विद्यापीठातील डॉ. एम. जी. मुळा, डॉ. एम. आर. अवघडे, औरंगाबाद विद्यापीठातील डॉ. सईद अजहरुद्दिन, डॉ. नंदकुमार राठी यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ.टी. जी. गिते, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

चर्चासत्रात सहभागी झालेल्या सुमारे ६० संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काजल शहा, प्रा. रसिका तांबे तर प्रा.गणेश धुमाळ यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख